RNI No. MAHBIL/2012/48433
Regn. No. PCE/065/2013-15
www.dgps.maharashtra.gov.in.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ४, अंक - २८ ] गुरुवार ते बुधवार, जुलै ९ - १५, २०१५ / आषाढ १८ - २४, शके १९३७ [ पृष्ठे ३१२

प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**URBAN DEVELOPMENT DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai-400 032

dated 30th May 2015

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांजकडून**

*महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ मधील कलम ३ नुसार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या सेवा अधिसूचित करणेबाबत.*

***अधिसूचना***

क्रमांक म.रा. वखार महामंडळ/व्यवि/लो. ह. अध्यादेश २०१५/१७१९.— ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हे "वखार कायदा, १९६२" नुसार सार्वजनिक प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्यात राज्य वखार महामंडळाची कर्तव्ये पार पाडीत आहे ;

आणि ज्याअर्थी, "महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५" चे कलम ३ नुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेशाच्या प्रारंभीच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे महामंडळ पुरवित असलेल्या खालील लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा अधिसूचित करीत आहे.

## परिशिष्ट

| अ. क्र. | सेवा | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालासाठी गोदामामध्ये जागा उपलब्ध करून देणे. | २ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | संबंधित विभाग-प्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| २ | शेतकरी व इतर ठेवीदारांनी अन्नधान्य साठवणूक केल्यानंतर प्राथमिक धुरीकरणाची सेवा मागितल्यास देणे. | ५ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | संबंधित विभाग-प्रमुख | शाखा प्रमुख (प्रत नियंत्रण) |
| ३ | शेतकरी/व्यापारी/वितरक/ठेवीदार यांना आवश्यकतेप्रमाणे ठेकेदार नियुक्त केलेल्या वखार केंद्रांवर हाताळणी व वाहतुकीची सेवा, महामंडळाने नियुक्त केलेल्या कंत्राटदारांमार्फत पुरविणे. | १ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | संबंधित विभाग-प्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ४ | शेतकऱ्यांना तारण ऋण मिळविण्याकरिता हमी राहण्याचे दृष्टीने निगोशिएबल वखार पावतीवर तारण नोंदविण्याची सेवा उपलब्ध करून देणे. | ५ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | विभागप्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ५ | साठवणूकीत असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीमालाची विहित पद्धतीनुसार ठेवीदारांच्या मागणीप्रमाणे जावक देणे. | २ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | विभागप्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ६ | ज्या वखार केंद्रांवर चाळणी व प्रतवारीची मशीन सेवा कार्यान्वित आहे, अशा वखार केंद्रांवर धान्याची चाळणी व प्रतवारी करून देणे. | ७ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | विभागप्रमुख | शाखा प्रमुख (प्रत नियंत्रण) |
| ७ | व्यापारी, वितरक व अन्य ठेवीदारांना उपलब्धतेनुसार जागा उपलब्ध करून देणे. | | | | |
| | (अ) साठवणूक धर्तीवर स्वीकारण्यासाठी | २ दिवस | केंद्रप्रमुख | विभागप्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| | (ब) आरक्षण पद्धतीवर (व्यवसायासाठी निश्चित केलेला दिनांक). | ७ दिवस | विभागप्रमुख | शाखाप्रमुख (व्यवसाय विकास) | सह.व्य.सं., व स. |
| | (क) लॉक ॲन्ड की पद्धतीवर | ७ दिवस | उपव्यवस्थापक (व्यवसाय विकास) | शाखाप्रमुख (व्यवसाय विकास) | सह.व्य.सं., व स. |
| ८ | कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये ठेवीदारांना आयात माल साठविण्यासाठी उपलब्धतेनुसार जागा उपलब्ध करून देणे. | २ दिवस | उ. व्यव. (CFS) | व्यव. (CFS) | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ८-अ | कंटेनर फ्रेट स्टेशनमध्ये ठेवीदारांना निर्यात करण्यासाठीचा माल साठविण्यासाठी उपलब्धतेनुसार जागा उपलब्ध करून देणे. | २ दिवस | उ. व्यव. (CFS) | व्यव. (CFS) | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ९ | मालाची निर्यात/आयात करताना सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंटेनर स्टफिंग/डिस्टफिंग करणे. | २ दिवस | उ. व्यव. (CFS) | व्यव. (CFS) | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| ९-अ | मालाची निर्यात/आयात करताना सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंटेनर स्टफिंग/डिस्टफिंग करणे. | २ दिवस | उ. व्यव. (CFS) | व्यव. (CFS) | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |
| १० | सीमा शुल्क विभागाच्या निर्देशानुसार आयात केलेल्या मालाची पब्लिक बॉण्डेड वखारकेंद्रावर साठवणूक सुविधा उपलब्ध करून देणे (CFS पब्लिक बॉण्डेड वेअरहाऊस येथे). | ३ दिवस | संबंधित केंद्रप्रमुख | विभागप्रमुख | शाखा प्रमुख (व्यवसाय विकास) |

**विश्वास ज. भोसले,**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे.

पुणे, २६ जून २०१५.